|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade – A Grade
NAAC Re-Accredited (3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

☎ 0257-2257418, 419 FAX - 0257-2258403, 406 Email- sw@nmu.ac.in Website- nmu.ac.in

जा.क्र. उमवि/१४/विक/विवैत/ ९५८ /२०१७ दि.१०/०७/२०१७

प्रति,

**मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख,**

उमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था,

विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना

**विषय :- विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन अहवाल पाठविणे बाबत ...**

महोदय/महोदया,

शासन आदेशान्वये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विद्यार्थी योजनेचा एक भाग म्हणून **' विद्यार्थी वैद्यकीय तपासणी योजना '** लागू केली आहे. या योजनेतंर्गत प्रथमवर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व शाखेतील, प्रथम् वर्ष व पद्व्युत्तर वर्गाच्या सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनींची तसेच वसतिगृहात राहणा-या विद्यार्थी-विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. सदर योजनेसाठी विद्यापीठ परिपत्रक क्रमांक १२४/२००८ नुसार विद्यार्थ्यांकडून दरवर्षी प्रवेश घेतेवेळी प्रत्येकी रु. २५/- वैद्यकीय शुल्क आकारण्यात येत असते. असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था ही योजना गांभिर्याने राबवित नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैद्यकीयदृष्ट्या काही गंभीर समस्या निर्माण झालेली असल्यास विद्यार्थ्यास वैद्यकीय मदतीची आवश्यकता असल्यास त्यावेळी तांत्रीक अडचणी निर्माण होऊन विद्यार्थ्यास आर्थिक मदत होत नाही. त्या अनुषंगाने या परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, खालील सूचनेप्रमाणे योग्य कार्यवाही व्हावी.

१) वैद्यकीय तपासणी अर्ज http//www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Download Formats मध्ये उपलब्ध आहेत. सदर अर्जाची किंमत विद्यार्थी संख्येप्रमाणे बॅकेत Online प्रचलित पध्दतीने जमा करावी व बॅकेकडून प्राप्त झालेली UTR NO. असलेली पावती (Receipt), प्रवेशित विद्यार्थी यादी, अहवाल आदी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, उमवि, जळगाव यांचेकडे **दि. ३१ ऑक्टोबर, २०१७** पुर्वी जमा करावी.

२) आपल्या कडील विद्यार्थी-विद्यार्थिनींची प्रत्यक्षात वैद्यकीय तपासणी करुनच वैद्यकीय अधिका-यांकडून फॉर्मस् भरुन घ्यावेत व वैद्यकीय तपासणीनंतर सर्व संबंधीत विद्यार्थी-विद्यार्थिनींचे वैद्यकीय अर्ज (फॉर्मस्) विद्याशाखा व वर्ग निहाय लेस फाईल मध्ये लावावेत व शैक्षणिक कालावधी पुरते सर्व अर्ज सुरक्षीत सांभाळावेत.

३) वैद्यकीय तपासणी अर्जाच्या सहाय्याने सोबतच्या नमुन्यात अहवाल कृपया काळजीपूर्वक तयार करुन मुदतीत सादर करावा.

४) ज्यांचे वैद्यकीय तपासणी अहवाल, विद्यार्थी यादी व अर्ज एकत्रित शुल्क पावतीसह **दि. ३१ ऑक्टोबर, २०१७** पूर्वी विद्यापीठ आरोग्य केंद्रात प्राप्त होणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा त्यांचे परीक्षांचे निकाल रोखून धरण्यात येतील, कृपया उपरोक्त नोंद घ्यावी, हि विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

(प्रा. एस.टी. इंगळे)

**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत** :- वैद्यकीय तपासणी अर्जाचा नमूना व तक्ता- २०१७-१८

**प्रत माहितीसाठी :-**

१) जनसंपर्क अधिकारी, उमवि, जळगाव :- कृपया, वृत्तपत्रातून प्रसिध्दी द्यावी.

२) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, उमवि, जळगाव :- कृपया, संकेत स्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३) वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, उ.म.वि., जळगाव.

४) रोखपाल, वित्त विभाग, उ.म.वि., जळगाव.

D:\Shivade\Medical Form

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

### ★ विद्यार्थी वैद्यकीय तपासणी अर्ज व विद्यापीठात जमा करावयाची रक्कम दर्शविणारा तक्ता २०१७-१८ ★

| अ. क्र. | महाविद्यालये/परिसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांचे नांव | प्रवेशित विद्यार्थी संख्या (शैक्षणिक वर्ष २०१७-१८) | | | | वैद्यकीय अर्जांची संख्या व एकुण शुल्क रक्कम | | | वैद्यकीय अधिकारी यांची सही व शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग | मुले | मुली | एकुण | अर्जांची संख्या | UTR NO. (Receipt) | रक्कम | |
| १. | | F.Y.B.A. / B.Com. / B.Sc. / Engg. / B.B.S. / B.Tech / Archi/ Law / Fine Arts / B.S.W. / B.P.E. / B.C.J. / B.Lib. / Pharmacy / B.C.A./ Other | | | | | | | |
| २. | | B.Ed. / B.PEd. / M.PEd./ Med./ Other | | | | | | | |
| ३. | | M.A. / M.Com. / M.Sc. / M.S.W./ M.C.A. / M.B.A. / M.C.J. / M.Lib / M. Tech / L.L.M./ M.Pharm./ Other | | | | | | | |
| ४. | | आपणाकडे वसतिगृह असल्यास विद्यार्थी संख्या | | | | | | | |
| ५. | | एकुण | | | | | | | |

दिनांक :- / / २०१७

स्थळ :-

**प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख**

सही व शिक्का

<u>टिप</u> :- १) विद्यार्थी वैद्यकीय तपासणी योजना विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना सक्तीची असून मा. प्राचार्य/संचालक/ विभाग प्रमुख यांनी वैद्यकीय अर्जातील माहिती भरुन पाठविणे आवश्यक आहे.

२) अनावश्यक/लागू नसलेला रकाना निरंक कळवावा.

प्रत - वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, उमवि, जळगाव

D:\Shivde/Medical Form 21613